रे.के.नं.९३/२०२३
नि.क्र. ११/क च्या पुढे

**<u>उलटतपास आरोपीतर्फे आरोपीचे वकील श्री. एस.पी. घरत यांच्याव्दारे...</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, मी सन २०२३ मध्ये मेहेर फाऊंडेशन प्रा.लि. या कंपनीत आरसीएम कार्यरत होतो, याबाबतचा कागदोपत्री पुरावा पोलीसांना दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मेहेर फाऊंडेशन यांना जेएनपीटी येथून काम मिळाल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी पोलीसांना दिला नाही. आता मला अभिलेख दाखविले असता, तसा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. आमचे कंपनीत दोन शिफ्ट मध्ये काम चालत असे, त्यामध्ये सकाळी ८.०० ते संध्याकाळी ८.०० व संध्याकाळी ८.०० ते सकाळी ८.०० अशा शिफ्ट होत्या. आमचे कंपनीत कामगार आल्याची व निघून गेल्याची नोंद एचआर विभागमध्ये ठेवली जाते. मी पोलीसांना तपास कामी कामगार येण्याची व जाण्याच्या वेळे संबंधीची वही दिलेली नाही. घटनेच्या दिवशी किती कामगार उपस्थीत होते त्यांची नावे व इतर विवरण मी पोलीसांना दिले नाही. भेंडखळ ते फुंडे हे अंतर अंदाजे ५ किमी असेल. मला फोन किती वाजता आला होता, त्याची वेळ आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासत सांगितल्याप्रमाणेचा कोणताही फोन आलेला नाही. घटनेच्या पुर्वी मी प्रकाश म्हात्रे यांना ओळखत नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्यापुर्वी प्रकाश म्हात्रे यांनी मला कामासंबंधी कधीही विचारले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, १ जानेवारी ते १९ जानेवारी या कालावधीत आरोपीने मागणी केल्याबाबतचा कोणताही अर्ज मी पोलीसांना दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, काम हे रस्त्यालगत चालू होते. हे म्हणणे खरे नाही की, काम चालू होते त्या जागेवरुन फुंडे गावातील लोकांना येण्या जाण्याचा रस्ता आहे. घटनेच्यावेळी तेथे गावातील लोकांची गर्दी नव्हती. मला फोन आल्यावर अर्धा ते एक तासाने मी घटनास्थळावर गेलो. मी घटनास्थळावर गेलो तेव्हा कीती वाजले होते, ते मला आठवत नाही. मी पोलीस ठाण्यात तक्रार देण्यास किती वाजता गेलो, ती वेळ मला सांगता येत नाही. मी तक्रार देण्यास गेलो तेव्हा माझे सोबत दिलीप पांडे, सुतेज

पाटील हे होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळवर तिवराची झाडे होती. हे मला माहित नाही की, तिवरांच्या झाडांची कत्तल होत असल्याने फुंडे गावातील सरपंच व रहिवाशांनी तहसिलदार व वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे कडे तक्रार दाखल केली होती. हे मला माहित नाही की, त्याबाबतची बातमी पुण्य नगरी व इतर वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या झाडांची कत्तल करु नये, म्हणून सरपंच व ग्रामस्थांनी मला तोंडी विनंती केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही चुकीच्या पद्धतीने काम करीत होतो व तशी तोंडी सुचना आम्हाला सरपंच व ग्रामस्थांनी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मला किती वाजता फोन आला व किती वाजता घटनास्थळावर गेलो हे मी मुद्दामहून कोर्टापासून लपविण्यासाठी सांगत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरपंच व ग्रामस्थांनी आमचे कंपनी विरुद्ध तक्रारी दाखल केल्याने कंपनीच्या सांगण्यावरुन मी खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालया समक्ष खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

(एस.पी.वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण
(कोर्ट नं. २)

उरण,
दिनांक –२१/११/२०२५